वलनवाला दि.०२/०४/२०२२

# साडेनऊ लाख लुटण्याचा प्रयत्न करणारे आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

वलनवाला ०२/०४/२०२२

**अर्धापूर (प्रतिनिधी)**

१५ दिवसांपूर्वी बँकेत रक्कम भरण्यासाठी जाणाऱ्या व्यवस्थापकाच्या दक्षतेने साडेनऊ लाख रुपये लुटीचा प्रयत्न फसला होता.सदर घटनेतील आरोपींना अर्धापूर पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

अर्धापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दि.१४ मार्च रोजी पेट्रोल पंपावर जमा झालेले ९ लाख ५४ हजार रुपये बँकेमध्ये भरण्यासाठी व्यवस्थापक दादाराव डाके जात असतांना समोरून आलेल्या दुचाकीवरील एम.एच.३८-०८९३ बजाज पल्सर वरील तोंडावर कपडे बांधलेल्या अज्ञातांनी डाके यांची गाडी पाडण्याचा प्रयत्न केला. यावेळी चोरट्यांचा लुटीचा डाव फसला होता सदर प्रकरणी दादाराव डाके यांच्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात कलम ३९३ भादवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि साईनाथ सुरवसे, कपिल आगलावे,संजय घोरपडे,राजेश घुन्नर, महेंद्र डांगे,बंटी चव्हाण यांनी मोठ्या शिताफीने तपासाची मोहीम राबवली असून या प्रकरणी ५ जनांना पोलीसांनी गुप्त खबरांच्या माहिती वरून मुसक्या आवळल्या आहेत.राजू एकनाथ चव्हाण खांडेगाव ता. वसमत,सर्जेराव रोहिदास होळपादे करंजी ता.वसमत;देवानंद बालाजी दुधमोगरे खांडेगाव ता.वसमत,अतुल रमेश तुरेवार रा खांडेगाव ता.वसमत,पवन माणिकराव डाखोरे पळसगाव ता.वसमत यांना गजाआड केले आहे.

फक्त पंधरा दिवसांमध्ये सदर प्रकरणाचा पोलिस प्रशासनाने छडा लावल्याबद्दल सामान्य जनतेतून कौतुक होत आहे.

वलनवाला ०२/०४/२०२२

# पोलिसाची कॉलर धरणाऱ्यास २५ हजार दंड

**नांदेड (विशेष प्रतिनिधी)**

वाहतूक सिग्नल तोडून पोलिस शिपायाचा शर्ट पकडून धक्काबुक्की करणाऱ्या युवकास अतिरिक्त सत्र न्यायाधीश शशिकांत बांगर यांनी कोर्ट उठेपर्यंत शिक्षा आणि २५ हजार रुपये दंड ठोठावला.

२७ नोव्हेंबर २०१२ रोजी दुपरी २ च्या सुमारास तरोडा नाका येथे पोलिस शिपाई बापुराव काशिराम चव्हाण हे कर्तव्य बजावत असतांना सुनिल निवृत्ती वाघमारे (२४) रा.महसूल कॉलनी हा सिग्नल तोडून पुढे आला. पोलिस शिपाई चव्हाण यांनी विचारणा केली असता सुनिलने त्यांची कॉलर पकडून धक्काबुक्की केली. या प्रकरणी पोलिस शिपाई चव्हाण यांनी भाग्यनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. जमादार सरोदे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायाधीश शशीकांत बांगर यांच्यासमोर सुनावणी झाली. उपलब्ध पुराव्याच्या आधारावर न्या.बांगर यांनी सुनिल वाघमारेला कोर्ट उठेपर्यत शिक्षा आणि २५ हजार रुपये रोख दंड ठोठावला. सरकारी पक्षाच्या वतीने अॅड. आशिष गोदमगावकर तर आरोपीच्या वतीने अॅड.मनिष शर्मा यांनी काम पाहिले. पैरवी अधिकारी म्हणून भाग्यनगर पोलिस ठाण्याचे जमादार सादीक पटेलन यांनी काम पाहिले.